# वित्त योजनांसाठी केरी-फोंडा येथे शिबिरास प्रतिसाद



**फोंडा :** केरीतील शिबिरास उपस्थित अधिकारी आणि मान्यवर.

**फोंडा, ता. १६ :** भारत सरकारच्या वित्तीय सेवा विभागाने सुरू केलेल्या वित्तीय समावेशन योजनांच्या तीन महिन्यांच्या देशव्यापी संपृक्तता मोहिमेचा एक भाग म्हणून फोंडा तालुक्यातील केरी ग्राम पंचायतीमध्ये राज्यस्तरीय बँकर्स समितीद्वारे शिबिर आयोजिले होते.

प्रधानमंत्री जन धन योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना यासारख्या जनसुरक्षा योजनांची व्याप्ती वाढविण्यासाठी आणि केवायसीची फेरपडताळणी करण्यासाठी आयोजित शिबिराला प्रियोळ मतदारसंघाचे आमदार गोविंद गावडे उपस्थित होते.

यावेळी गावडे यांनी ग्रामस्थांना शासनाच्या विमा व पेन्शन (निवृत्ती वेतन) योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. रिझर्व्ह बँकेचे कार्यकारी संचालक अर्णब कुमार चौधरी यांनी तळागाळापर्यंत वित्तीय समावेशनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि वित्तीय जागरूकता वाढवण्यासाठी आरबीआय बजावत असलेल्या भूमिकेवर प्रकाश टाकला. रिझर्व्ह बँकेचे प्रादेशिक संचालक प्रभाकर झा यांनी उपस्थितांना योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. एसबीआयचे साहाय्यक महाव्यवस्थापक कार्लोस रॉड्रिग्स यांनी स्वागत केले, तर एसबीआयचे डीजीएम शैलेंद्र मिश्रा यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला नाबार्डचे महाव्यवस्थापक संदीप धारकर, आयओबीचे प्रादेशिक प्रमुख कुणाल सिंग, जीएससीबीचे व्यवस्थापकीय संचालक अनंत चोडणकर आणि आरबीआय आणि इतर बँकांचे अधिकारी उपस्थित होते.